F/C

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र:०२२-६८५९७४८६, ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.inवेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**तात्काळ -स्पीड पोस्ट /ई-मेलद्वारे**

क्रमांक : १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१/१६०
दिनांक : ०३/०५/२०२१

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या कार्यवाहीबाबत....( मुदतवाढ )**

संदर्भ :- १) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/२०२०/३७७ दि. ०३ /१२/२०२०
२) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/विकाप/२०२१/१३ दि. १३ /०१/२०२१
३) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/विकाप/२०२१/४६ दि. ११ /०२/२०२१
४) या कार्यालयामार्फत डीबीटी पोर्टलवरील योजनांबाबत घेतलेली V.C.बैठक दि. १२ /०२/२०२१
५) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/व्ही.सी./२०२१/५९ दि. २४ /०२/२०२१
६) या कार्यालयाचे अ.शा.पत्र क्रमांक : १८/तंशिसं/डीबीटी/२०२१/ ६४ दि. ०१/०३/२०२१
७) सामान्य प्रशासन विभाग (मा.तं.) यांचे पत्र क्र.डीबीटी २०१८/प्र.क्र.४७/से-१/३९ दि.०१/०३/२०२१
८) या कार्यालयाचे अ.शा.पत्र क्रमांक : १८/तंशिसं/डीबीटी/२०२१/ ७८ दि. ०४/०३/२०२१
९) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/व्ही.सी./२०२१/५९ दि. २४ /०२/२०२१
१०) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१/१४३ दि. ०६ /०४/२०२१
११) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१/१५४ दि. १९ /०४/२०२१

उपरोक्त १ ते ६ व ९ ते ११ च्या संदर्भीय पत्रान्वये, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडीबीटी पोर्टलवर **तंत्रशिक्षण संचालनालयाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत** सर्व विभागीय कार्यालयांमार्फत त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना, महाडीबीटी पोर्टलवरील योजनांच्या लाभासाठी त्वरीत, पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेण्याबाबत तसेच संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये व विभागीय कार्यालयांनी त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त होणारे योजनांचे अर्ज प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या अटी व शर्तीनुसार तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करुन ताबडतोब निकाली काढण्याबाबत वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.

महाडीबीटी पोर्टलवर सन २०२०-२१ करिता विद्यार्थ्यांना अर्ज भरुन अंतिम करण्यासाठी **दि. ३१ /०५ / २०२१ पर्यंत** मुदतवाढ देण्यात जाहीर करण्यात आलेली आहे. सोबत याबाबतचा स्क्रीनशॉट जोडला आहे.

सर्व विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना असे सूचित करावे की, डीबीटी पोर्टलवर सन २०२०-२१ करिता, तंत्रशिक्षण संचालनालयाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभासाठी ज्या पात्र विद्यार्थ्याने अर्ज भरलेला नाही अशा **पात्र विद्यार्थ्यांकडून दिलेल्या वाढीव मुदतीत अर्ज भरून घ्यावेत** तसेच विद्यार्थ्यांना परत पाठविण्यात आलेले त्रुटी असलेले अर्ज ( Sent Back अंतर्गत असलेले अर्ज ) विद्यार्थ्यांना अर्जांची त्रुटी दूर करण्याबाबत कळवून अर्ज भरुन घेण्यात यावे व संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त होणारे योजनांचे अर्ज प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या अटी व शर्तीनुसार तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे. जर पात्र विद्यार्थी योजनेचा अर्ज भरण्यापासून वंचित राहिल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी. तसेच जर

संबंधित योजनांच्या शासन निर्णयातील अटी व शर्तींची पूर्तता करत नसतानाही विद्यार्थ्यांचा अर्ज संस्थेकडून मंजूर करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्यास याबाबत संस्था प्राचार्यांवर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

योजनेचे अर्ज मंजूर करतेवेळी खालील बाबी कटाक्षाने तपासूनच अर्जांना मंजूरी द्यावी.

१. " डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना " या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करताना, विद्यार्थी शिक्षणासाठी वसतिगृहामध्ये किंवा पेईंगगेस्ट म्हणून राहात असलेबाबतची संस्थांनी स्वत: संपूर्ण शहानिशा करुनच योजनेच्या अटी व शर्तींनुसार अर्ज तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करावे. अपात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले तर याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी.

२. विद्यार्थी केंद्र शासनाच्या ( NSP Portal ) व महाराष्ट्र शासनाच्या ( DBT Portal ) पोर्टलवरील योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्थांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

३. विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन - दोन योजनांचा ( केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही योजनांचा ) लाभ प्राप्त करुन घेतल्यास किंवा संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्याच्या अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्याचे आढळून आल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी.

तसेच, विभागीय कार्यालयांनीदेखील त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त होणारे योजनांचे अर्ज प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या अटी व शर्तीनुसार तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करुन निकाली काढावे.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई.

https://mahadbtmahait.gov.in/lc ×

mahadbtmahait.gov.in/login/login

Skip To Main Content   Skip To Navigation

Home  A+  A=  A-  मराठी

आपले सरकार  महाDBT

Shri Uddhav Thackeray
Hon'ble Chief Minister
Maharashtra State

How to Apply Online ? | Benefit Schemes | Post Matric Scholarship | Pre Matric Scholarship | Pension Schemes | Farmer Schemes | Labou Scher

Application Acceptance (New/Renewal) for A.Y.20-21 has been Extended to 31st May 2021.

## Notice

Attention!!!

- Application Acceptance (New/Renewal) for A.Y.20-21 has been Extended to 31st May 2021.
- Guidelines and Rules of procedure for application submission. Please read carefully.

Guidelines and Rules

Download Colleges list

Click here for Help

## Login

### Applicant Login Here

Enter UserName

********

WZSZR

Refresh
Enter the text shown in image

Login Here   Forgot Password   Forgot Username

### Instructions

- Enter your registered username
- Enter your Password
- Enter the security text shown in the image
- After confirm login password and security text click on **Login Here** button for login
- Click on Forgot Password, if you forgot your password entered while registration
- Click on Forgot UserName, if you forgot your UserName entered while registration

Join MAHADBT Group on Microsoft Kaizala

New Applicant Registration

Applicant Login

Institute / Dept / DDO Login

Grievance / Suggestions

User Manuals

Help file for Online Application Process

Start   10:56 AM 04-05-2021